ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year-VI, Issue-XII, Vol.- I

Impact Factor 5.50 (GRIFI)

(Mar. 2020 To Aug. 2020)

IAP
INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF
Dr. Balaji G. Kamble

Issue : XII, Vol. I
I W R J
IMPACT FACTOR 5.50
ISSN 2454-3292
March 2020 To August 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Critical Analysis of Farmers' Suicides in Maharashtra<br>**Dr. Nilam Chhangani** | 1 |
| 2 | Trends and Challenges of India's Balance of Payments<br>**Dr. D. V. Shinde** | 10 |
| 3 | John Masters Savage Novel "Night Runners of Bengal"<br>**Dr. Anuradha S. Jadhale** | 16 |
| 4 | Reading Habits of Ladies Students in Academic Libraries<br>**Kishan K. Talgane** | 24 |
| 5 | Historical Approach and Yoga Sutras in Wrestling<br>**Dr. B. N. Gapat** | 30 |
| 6 | Indira Gandi and Bangladesh War Foreign Policy<br>**Dr. S. M. Akashe** | 37 |
| 7 | साठोत्तरी हिन्दी गजल में राजनीतिक बोध<br>**डॉ. विरनाथ पांडूरंग हुमनाबादे** | 43 |
| 8 | घेतलेल्या कर्जाबाबत अकोला जिल्हा मध्यवती सहकारी बँकेची महाराष्ट्रातील इतर जिल्हा मध्यवती सहकारी बँकांशी तुलना<br>**सुनिल हरीभाऊ पांडे** | 47 |
| 9 | भारतातील वेद व पुराणातील इतिहास लेखन<br>**शिवाजी पाडदे** | 51 |
| 10 | पर्यावरणवादी साहित्याचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. एच. एम. गायकवाड** | 56 |
| 11 | महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषयक विचारांचा आढावा<br>**डॉ. एस. व्ही. शेटे** | 59 |

**Indo Western Research Journal (IWRJ)** (56)

IMPACT FACTOR 5.50

www.irasg.com

ISSN 2454-3292
Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XII, Vol. : I
March 2020 To August 2020

Research Paper 10 Marathi

# पर्यावरणवादी साहित्याचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. एच. एम. गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय,
परंडा, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र) भारत

मराठी साहित्यामध्ये सर्वव्यापी लेखन झाले आहे. मराठी शब्दबंधातील मराठी शब्दाला नैसर्गिक परिसर पर्यावरण असे म्हटले जाते. सर्वच सजीव एकमेकांशी संबंधीत, एकमेकांवर अवलंबुन असतात. मानव हा देखील एक प्रकारचा सजिवच आहे त्यामुळे याचा देखिल अभ्यास केला जातो. माणुस हा पर्यावरणात राहत असल्याकारणाने पर्यावरणवादी साहित्याची निर्मिती झाली. मराठी साहित्यामध्ये पर्यावरण हा नविन शब्द नाही त्यावर मोठ्या प्रमाणात लेखन झाले आहे, परंतु इतर भाषेच्या तुलनेत लेखनाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. चांगलं साहित्य कशाला म्हणायचं हा प्रश्न जरी अवघड वाटला तरी त्याचं उत्तर मात्र अगदी सोपं आहे. म्हणून ते पहिल्यांदाच देऊन टाकतो ; जे आपल्याला चांगलं वाटतं ते चांगलं !

हे उत्तर वाचल्यावर वाचणारे म्हणतील की छे ! हे काय ? हे काय उत्तर झालं ? आणि हे जर उत्तर असेल तर मग त्यासाठी लेख कशाला लिहायला पाहिजे ? वाचकांच्या मनात अशी प्रतिकिया आली तर त्यात काही वावगं नाही, पण नीट विचार केला तर लक्षात येईल की हेच खरं उत्तर आहे --पहिलं आणि अंतिम. कारण साहित्याचं वाचन कुठे होत असतं ? व्यक्तीच्या मनात. म्हणजे व्यक्तिगत पातळीवर. त्यामुळे त्या व्यक्तीला जे चांगले वाटेल किंवा ज्यामुळे चांगल वाटेल ते चांगलं साहित्य ; असं त्याचं सरळ उत्तर आहे. एखाद्या साहित्यकृतीला इतर लोक ढीग चांगलं म्हणत असतील, पण आपल्याला जर ती चांगली वाटली नाही तर तिला चांगलं म्हणणार का ? नाहीच ! आपल्याजवळ फक्त आपलं मन असतं. त्यामुळे आपल्या मनाचा जो कौल तोच खरा.

हे उत्तर खरं जरी असलं तरी त्यामुळे वाचणाऱ्यांचे समाधान होणार नाही, याची मला कल्पना आहे. कारण असं जर मानलं तर मग आपल्या भाषेत किंवा समाजात चांगलं साहित्य कशाला म्हणायचं याची चर्चा करता येणार नाही. आपण समाजात राहतो त्यामुळे आपल्याला जगताना फक्त आपल्याला आवष्यक वाटतो. त्यामुळे सगळ्यांनी मिळून चांगलं साहित्य कशाला म्हणायचं किंवा कशाला म्हणतात हेही ठरवायला लागतं.

साहित्याला चांगलं ठरवण्याचे सध्याचे मापदंड काय आहेत ? ते कसे लावले जातात ? कोणत्या तऱ्हेने सांगितले जातात ?

सध्या हे करण्याची एक विशिष्ट भाषा तयार झाली आहे. उदाहरणार्थ, असं म्हटलं जातं की ज्या साहित्यातून 'सखोल जीवनदर्शन ' होत ते चांगलं साहित्य. किंवा ज्यातून ' वास्तवाचं ज्ञान ' होतं ते चांगलं. कोणी असंही म्हणतात की ज्यातून सामाजिक वेदनेला वा अन्यायाला वाट मिळते तेच चांगलं साहित्य. कोणाला असं वाटतं की ज्यातून सध्याच्या समस्या मांडल्या जातात तेच चांगलं ; तर कोणीह असे समजतात की ज्यातून 'कलात्मक आनंद ' होतो ते चांगलं साहित्य.

या ज्या सगळ्या समजुती आहेत त्या काही खोट्या नाहीत, खऱ्याच आहेत. पण त्यांनी आपल्या मनाचं काही समाधान होत नाही. सखोल जीवनदर्शन म्हणजे काय कलात्मक आनंदम्हणजे काय हे जोपर्यंत नीट सांगितलं जात नाही तोपर्यंत आपल्या डोक्यात प्रकाश पडत नाही. दुसरं म्हणजे हा दंडक लावून जे लागलं ठरेल तेच चांगलं आणि इतर वाईट असं म्हणता येत नाही. एखादी गोष्ट अद्‌भुतकथा म्हणजे फँटसी असेल, तिचा वास्तवाशी काही संबंध नसेल तर तिला चांगलं म्हणायचं नाही का ? किंवा एखाद्या भक्या पारधी मुलीनं आपल्याला जगताना जे काही जाणवलं ते सरळ, साध्या भाषेत सांगितलं तर त्यात कला नाही किंवा तिची भाषा आपल्याला समजत नाही म्हणून त्याला चांगलं म्हणायचं नाही का ? याचं न्यायानं एखाद्या शहरी, मध्यमवर्गीय गृहिणीनं जर स्वतःचं मन प्रकट केलं तर त्याला संकुचित, मध्यमवर्गीय साहित्य म्हणून निकालात काढायचं का ?. 1/पृष्ठ क. 18–19 त्यामुळे चांगलं म्हणजे काय याचे दंडक लावणं चर्चेच्या दृष्टीने सोईचं जरी असलं तरी प्रत्यक्षात समाधानकारक होत नाही. याचं मुख्य कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या समजण्या–समजण्यात फरक असतो. एका व्यक्तीने किंवा एखाद्या गटाने चांगलेपणाचे जे मापदंड लावले असतील ते बाकीच्यांना मंजूर होतीलच असे नाही. कथा–कादंबरी–कवितेच्या बाबतीत असं नेहमीच घटतं. समीक्षक ज्याला चांगलं म्हणतात, ते लोकांना पटतंच असे नाही तर लोक ज्याला डोक्यावर उचलून घेतात, त्याकडे अभ्यासक ढुंकूनही पाहत नाहीत. त्यामुळे इथे चर्चा करताना सगळ्या व्यक्तींना मान्य होईल अशाच भाषेत आपल्याला बोललं पाहिजे. अशाच गोष्टींची चर्चा केली पाहिजे की, ज्यांचा अनुभव सगळ्यांना सारखा आहे. (आपण साहित्य म्हणतोय ते म्हणजे कथा–कादंबरी–नाटक–कविता अशा प्रकारचे काल्पनिक– ललित साहित्य. वैचारिक साहित्याबद्दल आपण बोलत नाही आहोत).

आपण जेव्हा कथा–कादंबरी वाचतो तेव्हा आपल्याला काय होत असतं ? म्हणजे आपल्या मनात काय होत असतं ? सगळ्यात पहिल्यांदा म्हणजे आपण त्यात गुंगून जातो. आपल्याला आपल्या भोवतालच्या जगाचा विसर पडतो. त्या कथा –कादंबरीतलं जे जग असतं ते तेवढ्या काळापुरतं तरी आपलं होतं. ते आपण खरं मानतो. त्यात जी पात्रे असतात, त्यांच्या जगण्याशी आपण समरस होतो. वाचत असतो तेवढा काळ तरी ती माणसं खरी आहेत असं आपल्याला वाटू लागतं. हातात घेतलेल्या पुस्तकाचा आणि आपला सांधा कसा जुळतो यावर आपलं हे गुंगून जाणं अवलंबून असतं. ही गुंगून जाण्याची जी मजा आहे ती वाचनातुन मिळणारी पहिली ठेव आहे. अशा प्रकारे मन गुंग होणं, एकाग्र होणं, एकतान होणं ही चांगल्या साहित्याची पहिली निशाणी म्हणायला पाहिजेकृ 2/पष्ठ क.134

नंतर काय होतं, तर आपल्याला कसली तरी समज येऊ लागते. आपण जे वाचतोय ते खरोखरच महत्वाचं किंवा चांगलं असेल तर आपल्याला त्यातुन काही तरी समजतंय, असं लक्षात यायला लागतं. हे समजणं प्रत्येक पुस्तकागणिक आणि त्यातल्या विषयगणिक वेगवेगळं असणार. पण

तसं ते व्हायला लागतं. तसं ते होतंय की नाही, हे कथा,कविता किंवा कादंबरी अशा एकाद्या वाङ्मयाप्रकाराने मराठी साहित्य समध्द केले आहे काय आणि असल्यास किती, असा प्रश्न वाङ्मयीन चर्चेमध्ये नेहमी येत असतो. बहुतेकवेळा या चर्चेसाठी काही विशिष्ट कालखंड घेतला जातो. म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडातली कथा,जागतिकीकरणानंतरची कादंबरी किंवा एकविसाव्या शतकातील कविता, इत्यादी. ही चर्चा बहुतेकवेळा साहित्याचे समीक्षक किंवा अभ्यासक करत असतात. त्यांची अशा विषयाकडे पाहण्याची किंवा त्यांचे विश्लेषण करण्याची एक विशिष्ट पध्दत असते आणि ह्या प्रश्नांचा निवाडा ते त्यांच्या पध्दतीने करतात. काही वेळा अशा चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी लेखकांना आमंत्रित केले जाते. लेखक या चर्चेमध्ये सहभागी होऊ शकतात, पणत्यांची विश्लेषणाची पध्दत ही वेगळी राहते. याचे कारण लेखक हे स्वतः निर्मिक असल्यामुळे समीक्षक – अभ्यासक ज्या अलिप्त पध्दतीने या विषयांकडे पाहू षकतात तसे ते करु षकत नाहीत. मग ते काय करु शकतात ? तर या चर्चेला उपयुक्त होईल असा संकल्पनात्मक ऐवज पुरवू शकतात, की ज्या योगे वाङमयीन समध्दतीचे आकलन सुलभ होईल.

एखाद्या वाङमयाप्रकाराने साहित्यविश्व समध्द केलं आहे काय याचा थांडोळा घेण्याआगोदर ही जी समध्दी म्हणतात ती म्हणजेच नेमकं काय हा खरा प्रश्न उभा राहतो. अमुक एक घर समध्द आहे असं आपण कशावरुन म्हणतो ? त्या घरासमोर दोन गाड्या आहेत म्हणून ? घरात उंची फर्निचर भरलेलं आहे म्हणुन ? जेवणाच्या टेबलावर निरनिराळ्या पदार्थाची लयलूट आहे म्हणून ? की घरात भरपूर पुस्तकं आहे म्हणून ? नेहमीच्या ' द्रव्यमय ' व्यवहारातही समध्दी म्हणजे काय हे ठरवणं आपल्याला कठीण जातं. मग साहित्यासारख्या 'मनोमय' व्यवहारात तर ते आणखीनच कठीण जाईल. 3/पृष्ठ क.68

साहित्याच्या क्षेत्राशी संबंधीत जे लोक आहेत त्यांच्यासमोर हा प्रश्न नेहमीच उभा राहत असतो की, आपल्या भोवतालच्या जगात, जीवनात साहित्याची भूमिका काय ? साहित्य हे जर मानवी जीवनातले एक महत्वाचे क्षेत्र आहे असे आपण मानत असू तर मग या क्षेत्राचा इतर क्षेत्रांशी संबंध काय ? साहित्याचा जो व्यवहार चालतो त्याला काही उद्देश, काही दिशा आहे की नाही ? की तो केवळ निरुद्देश, दिशाहीन पध्दतीने चाललेला आहे ? म्हणजे लिहिणारे लिहिताहेत, छापणारे छापताहेत, वाचणारे वाचताहेत आणि न वाचणारे अधिकच आनंदात जीवन कंठत आहेत. असं आहे की याच्या उलट हे लोक साहित्याच्या क्षेत्रात आहेत त्यांना आपल्या क्षेत्राच्या स्थानाजी, त्या स्थानाला जोडून येणाऱ्या भूमिकेची आणि त्यापोटी निर्माण होणाऱ्या कर्तव्यांची जाणीव आहे ? त्यानुसार ते पावले टाकताहेत ?

## संदर्भ सूची :-

1) दैनंदिन पर्यावरण – दिलीप कुलकर्णी
2) पर्यावरण – प्र.के. घाणेकर
3) माणुस आणि झाड – निळु दिमले